**[ ४२ ] सर्व पदवी व पदव्युत्तर विना अनुदानित अभ्यासक्रमांचे (संगणकाचे कोर्स वगळून) १५% शुल्क वाढीच्या धोरणात्मक निर्णयासाठी शुल्क समितीने केलेली शिफारस विद्या परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.१८/०६/२०१९ रोजी शुल्क निश्चिती समितीच्या बैठकीत आयत्या वेळेचा विषय क्र. १३ (३) नुसार सर्व उपस्थित सन्मानीय सदस्य व अध्यक्ष यांच्यात सर्वकष चर्चा होऊन सर्व पदवी व पदव्युत्तर विना अनुदानित अभ्यासक्रमांचे (संगणकचे कोर्स वगळून) १५% शुल्क वाढवून धोरणात्मक निर्णयासाठी विद्या परिषदेकडे सर्वानुमते शिफारस करण्याचे ठरले.

सबब, शुल्क निश्चिती समितीचा आयत्या वेळेचा विषय विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **सर्व पदवी व पदव्युत्तर विना अनुदानित अभ्यासक्रमांचे (संगणकाचे कोर्स वगळून) १५% शुल्क वाढीच्या धोरणात्मक निर्णयासाठी शुल्क निश्चिती समितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

**[ ४३ ] संलग्नता विभागाकडील महाविद्यालयांकडून स्थानांतरणासाठी शुल्क निश्चिती करण्याची डॉ. एस. एस. गोरे समितीची शिफारस शुल्क निश्चिती समितीने स्वीकारुन विद्या परिषदेस शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: आयत्या वेळेचा विषय १३ (२) अन्वये संलग्नता विभागाने विद्यापीठाकडे संलग्नित महाविद्यालये स्थानांतरणासाठी प्रस्ताव सादर करतात. सदरची कार्यवाही करण्याकरिता सद्यस्थितीत विद्यापीठाकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाहीत. न्यु. सातारा कॉलेज ऑफ बी. सी. ए., पंढरपूर यांचा स्थानांतरणासाठीचा प्रस्ताव प्राप्त झाला. सदर प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवला असता, व्यवस्थापन परिषदेने स्थानांतरणासाठी शुल्क निश्चित करण्याबाबत प्राचार्य. डॉ. एस. एस. गोरे यांची एक सदस्यीय समिती गठीत केली. त्यास अनुसरुन डॉ. एस. एस. गोरे यांनी महाविद्यालयाच्या स्थानांतरणासाठी महाविद्यालयाकडून ₹१५,०००/- अक्षरी पंधरा हजार फक्त इतकी शुल्क आकारण्याची शिफारस केली आहे.

सदरचा प्रस्ताव दि.१८/०६/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चिती समितीच्या बैठकीत ठेवला असता, शुल्क निश्चिती समितीने ठराव क्र.१३ (२) अन्वये डॉ. एस. एस. गोरे समितीची शिफारस मान्य करुन विद्या परिषदेकडे शिफारस केल्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **संलग्नता विभागाकडील महाविद्यालयांकडून स्थानांतरणासाठी शुल्क निश्चिती करण्याची डॉ. एस. एस. गोरे समितीची शिफारस शुल्क निश्चिती समितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

**[ ४४ ] मा. संचालक, संगणकशास्त्र संकुल यांनी विनंती केल्याप्रमाणे M. Sc. Mathematics आणि M. Sc. Statistics या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या वाढीव १० जागांच्या शुल्क निश्चिती सहपत्रास शुल्क शिश्चिती समितीने शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: आयत्या वेळेचा विषयातंर्गत विषय क्र.१३ (१) अन्वये संगणकशास्त्र संकुलामधील गणित व संख्याशास्त्र या विषयांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश क्षमता अनुक्रमे ४० व २० अशी आहे. विद्यार्थ्यांच्या मागणीचा विचार करुन या दोन अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी १० जागा विना अनुदानित तत्वावर वाढविण्यात आल्या आहेत. सदर प्रस्ताव दि.१८/०६/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चितीसमोर आयत्या वेळेचा विषय म्हणून विषय क्र.१३ (१) प्रमाणे ठेवले असता शुल्क निश्चिती समितीने संबंधित संकुलाच्या संचालकांनी दिलेल्या पत्रानुसार M. Sc. Mathematics आणि M. Sc. Statistics या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विना अनुदानित वाढीव १० जागासाठीचे शुल्क मान्य करुन विद्या परिषदेकडे सर्वानुमते ठराव क्र.१३ (१) नुसार शिफारस केली आहे.

सबब, सदरची शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **मा. संचालक, संगणकशास्त्र संकुल यांनी विनंती केल्याप्रमाणे M. Sc. Mathematics आणि M. Sc. Statistics या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या वाढीव १० जागांच्या शुल्क निश्चिती सहपत्रास शुल्क शिश्चिती समितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

[ ४५ ] **विद्यापीठ परिसर संकुलातील M. Sc. (Biostatistics), M. Sc. (Medicinal Chemistry) चे सहपत्रे आणि M. Sc. Computer Sicence Tuition Fee ₹६०००/- Lab Fee ₹४०००/- आणि M. C. A. Tuition Fee ₹७०००/- Lab Fee ₹१४०००/- शुल्क निश्चिती समितीने शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: मा. संचालक, संगणकशास्त्र संकुल यांनी दि.१३/०६/२०१९ रोजीच्या पत्राप्रमाणे M. Sc. Biostats हे नव्याने विद्यापीठ परिसरात सुरु करण्यात आलेले अभ्यासक्रम विषय क्र. ११ अन्वये शुल्क निश्चितीचे सहपत्र दि.१८/०६/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चिती समितीच्या बैठकीत ठेवण्यात आले होते.

मा. संचालक, रसायनशास्त्र संकुल यांनी दि.१७/०६/२०१९ रोजीच्या पत्रानुसार M. Sc. Medicinal Chemistry सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार शुल्क निश्चिती होऊन मिळणेबाबत प्रस्ताव पाठविला होता. सदरचा प्रस्ताव दि.१८/०६/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चिती समितीच्या बैठकीत विषय क्र. १२ अन्वये ठेवण्यात आला होता.

मा. संचालक, संगणकशास्त्र संकुल यांनी दि.१७/०६/२०१९ रोजी सादर केलेल्या टिपणीवर मा. प्र-कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार विषय क्र.१३ प्रमाणे दि.१८/०६/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चिती समितीच्या समोर ठेवण्यात आला होता.

शुल्क निश्चिती समितीने वरील विषय क्र.११, १२ आणि १३ वर खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

विषय क्र. ११, १२ आणि १३ विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल, रसायनशास्त्र संकुल यांच्या संचालकांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे विहित शुल्कास आणि M. C. A. New Tuition Fee ₹१४०००/- New Lab Fee ₹७०००/- तर M. Sc. Computer Science New Tuition Fee ₹६०००/- New Lab Fee ₹४०००/- आकारण्यास सर्वानुमते मान्य करुन विद्या परिषदेस शिफारस ठराव क्र.११, १२ व १३ नुसार करण्यात आली.

सबब, वरीलप्रमाणे केलेली शिफारशी विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **विद्यापीठ परिसर संकुलातील M. Sc. (Biostatistics), M. Sc. (Medicinal Chemistry) चे सहपत्रे आणि M. Sc. Computer Sicence Tuition Fees ₹६०००/- Lab Fees ₹४०००/- आणि M. C. A. Tuition Fees ₹७०००/- Lab Fees ₹१४०००/- शुल्क निश्चिती समितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

[ ४६ ] **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून शासनाने दिलेले Other Fees Head विद्यापीठाच्या Other Fee मध्ये समावेश करण्याबाबत सहपत्र ०८ नुसार शुल्क निश्चिती समितीने विद्या परिषदेस शिफारस केल्याची बाब विचारार्थ**

(टिपणी: ई-मेल अन्वये महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दि.२०/०२/२०१९ रोजी महाऑनलाईन लि. लोअर परेल, मुंबई येथे शासनाकडून राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील नोडल अधिकारी, इतर अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीस प्रस्तुत विद्यापीठातील डॉ. सु. नं. कांबळे, नोडल अधिकारी तथा उपकुलसचिव, सौ. अर्चना सांळुखे, उपकुलसचिव व श्री. मल्लाव ए.एस., वरिष्ठ लिपीक उपस्थित होते. बैठकीत शासकीय अधिकारी व प्रतिनिधीनी संबंधितांना शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर नमूद केलेले शुल्क हेड विद्यापीठांनी विद्यार्थ्यांकडून घेत असलेल्या शुल्काचे विवरण मेळ जुळणे आवश्यक आहे. त्याकरिता महाडीबीटी पोर्टलवर शासनाने अपलोड केलेले शुल्क हेड विद्यापीठांनी आपल्या Fee Structure मध्ये समावेश करावा, असे सूचित केले.

संबंधितांनी सूचित केल्यानुसार दि.१८/०६/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चिती समितीमध्ये विषय ठेवला असता, सदर समितीने विद्यापीठाचे सध्याचे विहित शुल्क शिर्षकातंर्गत शासनाने प्रस्तावित केलेले शुल्क शिर्षके समावेश करण्याचे सर्वानुमते मान्य केले आहेत.

सबब, सदरची बाब विचारार्थ).

| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून शासनाने दिलेले Other Fees Head विद्यापीठाच्या Other Fee मध्ये समावेश करण्याबाबत सहपत्र ०८ नुसार शुल्क निश्चिती समितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

[ ४७ ] **B. C. A. / B. Sc. E. C. S. / B. C. S. या अभ्यासक्रमांच्या शुल्क वाढीसंदर्भात शुल्क निश्चिती समितीने शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: मा. प्राचार्य, सांगोला महाविद्यालय, सांगोला यांनी दि.१३/०५/२०१९ रोजीच्या पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता B. Sc. E. C. S. व B. C. A. या अभ्यासक्रमांच्या शुल्काची पुर्नरचना करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा खालीलप्रमाणे अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

१) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन सध्याच्या वेतन आयोगाप्रमाणे करण्यास येणाऱ्या अडचणी.
२) वाढते लाईटबील दर, संगणकाचे अद्यावतीकरण, इंटरनेट लाईनचा खर्च व लॅबोटरी फी सुद्धा वाढविणे गरजेचे आहे.
३) बदलते अभ्यासक्रमानुसार संगणकासाठी लागणारी सॉफ्टवेअर प्रणाली नवीन विकत घेणे किंवा अद्यावत करणे गरजेचे आहे.
४) इतर विद्यापीठापेक्षा आपल्या विद्यापीठामार्फत या अभ्यासक्रमासाठी B.Sc. E.C.S. व B.C.A. फी अत्यंत कमी आहे.
५) प्रास्ताविक पाहता दरवर्षी १०% फी वाढ होणे अपेक्षित असताना सुध्दा फी न-वाढविणे.

तसेच मा. प्राचार्य, बी. पी. सुलाखे कॉमर्स, महाविद्यालय बार्शी यांनी त्यांच्या दि.०५/०४/२०१९ रोजीच्या पत्रानुसार B. C. A. कोर्सच्या शुल्कामध्ये गेल्या १० वर्षापासून फक्त एकदाच वाढ केलेली आहे. त्यामुळे अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

१) सध्याच्या शिक्षण शुल्काचा विचार करता शिक्षकांना द्यावा लागणारा पगार हा इतर महाविद्यालयापेक्षा कमी आहे.
२) दिवसेंदिवस वाढणाऱ्या लाईट बिलामुळे लॅब फी व इतर फी सुध्दा वाढविणे गरजेचे आहे.
३) दर चार-पाच वर्षांनी जुने संगणक Upgrade करणे किंवा बदलणे गरजेचे असते याचा नव्याने वाढलेल्या GST सारख्या करामुळे Infrastructure व Maintence वर खर्च वाढतो.
४) प्रत्यके विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात इंटरनेट सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यासाठी Leased Line ची आवश्यकता आहे. त्याच्यासाठी खर्च करणे आवश्यक आहे.
५) संगणकासाठी लागणारे Softwere नव्याने विकत घेणे अत्यंत गरजेचे आहे.

वरील दोनही प्राचार्यांचे पत्र विषय क्र.८ व ९ अन्वये दि.१८/०६/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चिती समितीसमोर विचारार्थ ठेवले असता, त्यावर शुल्क निश्चिती समितीने विषय क्र. ८, ९ यामध्ये प्रस्तावित केलेल्या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क, प्रयोग शाळा शुल्क आणि ग्रंथालय शुल्क यामध्ये १५% वाढ करण्याची तसेच B. C. S. आणि B. C. A. या अभ्यासक्रमासाठी समान शुल्क आकारण्याची शिफारस ठराव क्र.८ व ९ नुसार सोबत जोडलेल्या सहपत्र ०७ प्रमाणे केली आहे.

सबब, वरीलप्रमाणे केलेली शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **B. C. A. / B. Sc. (ECS) / B. C. S. या अभ्यासक्रमांच्या शुल्क वाढीसंदर्भात शुल्क निश्चिती समितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

**[ ४८ ] शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून प्रति विद्यार्थी ₹१००/- रजिस्ट्रेशन फी म्हणून महाविद्यालयांना घेण्यासंदर्भात विद्या परिषदेस धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: मा. प्राचार्य, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांनी दि.०५/०४/२०१९ रोजीच्या पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यार्थी प्रवेश, परीक्षा निकाल व कॉलेजचे दैनंदिन व्यवस्थापन करण्याकरिता नवीन संगणकप्रणाली राबविणार आहोत. त्यामुळे विद्यार्थ्यांची बिनचूक माहिती तसेच ऑनलाईन पेंमेन्ट, ऑप्शन प्रत्येक विद्यार्थ्याला युजर आय. डी. व पासवर्ड दिला जाणार आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांना कॉलेजची माहिती व सिलॅबस, ई-लर्निंग, उपस्थिती व फी संदर्भाबाबतची सर्व माहिती उपलब्ध करुन देणार आहोत. तरी शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून प्रति विद्यार्थ्यांकडून ₹१००/- प्रमाणे रजिस्ट्रेशन फी घेण्यास मान्यता मिळावी, अशी विनंती केली होती.

सदरचा विषय दि.१८/०६/२०१९ रोजी झालेल्या शुल्क निश्चिती समितीच्या बैठकीत ठेवले असता, सदर समितीने सदरचा विषय धोरणात्मक निर्णय घेण्यासंदर्भात विद्या परिषदेसमोर ठेवण्याची शिफारस ठराव क्र. ७ नुसार केली आहे.

सबब, सदरची शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून प्रति विद्यार्थी ₹१००/- रजिस्ट्रेशन फी म्हणून महाविद्यालयांना घेण्यासंदर्भात शुल्क समितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

[ ४९ ] **प्रस्तुत विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील एम. बी. ए. या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क सन २०१९-२० पासून AICTE ची मान्यता घेण्यासाठी शुल्क निश्चिती समितीने शुल्क प्रस्ताव मान्य करुन विद्या परिषदेकडे शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: मा. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन संकुल, प्रस्तुत विद्यापीठात संकुलातंर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता एम. बी. ए. हा अभ्यासक्रम चालू करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तथापि शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये एम. बी. ए. अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आकारण्यात येणाऱ्या फी चा तक्ता तयार करण्यात आला असून तो सोबत जोडला आहे. सदर तक्त्यातील फी तपासून अंतिम करण्यात यावी, अशी विनंती केली होती.

याबाबत दि.१८/०६/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चिती समितीमध्ये सर्वकष चर्चा होऊन चर्चेअंती AICTE ची मान्यता घेण्यासाठी शुल्क प्रस्ताव मान्य करण्यात येऊन विद्या परिषदेस ठराव क्र.६ अन्वये शिफारस करण्यात आली आहे.

सबब, सदरची शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील एम. बी. ए. या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क सन २०१९-२० पासून AICTE ची मान्यता घेण्यासाठी शुल्क निश्चिती समितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

**[ ५० ] प्राचार्य, लोकमंगल सायन्स ॲन्ड इंटरप्रिनरशिप कॉलेज, वडाळा महाविद्यालय यांचे B. Sc. उद्योजकता अभ्यासक्रमाच्या शुल्क वाढीसंदर्भात शुल्क निश्चिती समितीने सहपत्र ०५ प्रमाणे विद्या परिषदेकडे शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: मा. प्राचार्य, लोकमंगल सायन्स ॲन्ड इंटरप्रिनरशिप कॉलेज, वडाळा यांनी त्यांच्या दि.१६/१०/२०१८ व ०१/०१/२०१९ रोजीच्या पत्रानुसार महाविद्यालयामधील B. Sc. उद्योजकता कोर्स हा एकमेव अभ्यासक्रम असून तो विज्ञानशाखेतंर्गत शिकविला जातो. आतापर्यंत ३०० विद्यार्थ्यांनी फायदा घेतला असून भविष्यात हा कोर्स अनेक उद्योजक निर्माण करणारा असा आहे. तसेच हा कोर्स विना अनुदानित तत्वावर शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून सुरु आहे. त्याकरिता लागणारे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन व साहित्य ग्लासवेअर, उपकरणे, इंडस्ट्रियल भेटी, रसायने व मेंटेनन्स इ. साठी ₹९४.५० लाख प्रतिवर्ष खर्च होत आहे. त्या मानाने या कोर्सची फी फक्त ₹२,००,०००/- प्रतिवर्ष इतकी जमा होते. त्यासाठी संस्थेला हा कोर्स चालविण्याकरिता प्रंचड आर्थिक तरतूद करावी लागत आहे. सध्याच्या परिस्थितीत हा कोर्स पुढे चालू ठेवण्यास संस्थेत अशक्य वाटत आहे. त्यासाठी आपण कोर्सची असलेली फी किमान Biotechnology या कोर्स एवढी केली तर हा कोर्स पुढे चालू ठेवणे शक्य होईल, असे कळविले आहे.

सदरचा विषय दि.१८/०६/२०१९ रोजी झालेल्या शुल्क निश्चिती समितीच्या बैठकीत ठेवले असता, शुल्क निश्चिती समितीने B. Sc. Enterprinership प्रथम वर्ष ₹१८,०००/- द्वितीय वर्ष ₹१८,०००/- आणि तृतीय वर्ष ₹१८,०००/- ट्युशन फी आकारण्यात यावी व उर्वरित शुल्क विद्यापीठाने मान्य केलेल्या हेडप्रमाणे आकारण्यात यावे अशी शिफारस ठराव क्र. ५ अन्वये विद्या परिषदेकडे केली आहे.

सबब, सदर शिफारस सहपत्र ०५ प्रमाणे विचारार्थ).

| ठराव: | **प्राचार्य, लोकमंगल सायन्स ॲन्ड इंटरप्रिनरशिप कॉलेज, वडाळा महाविद्यालय यांचे B. Sc. उद्योजकता अभ्यासक्रमाच्या शुल्क वाढीसंदर्भात शुल्क निश्चिती समितीने सहपत्र ०५ प्रमाणे केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

**[ ५१ ] B. Voc. Food Processing भाग-१ ते ३ साठी वेतन निश्चिती समितीने शुल्क निश्चिती तक्ता सहपत्र ०७ नुसार शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: मा. प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर यांच्याकडे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून महाविद्यालयात B. Voc. Food Processing अभ्यासक्रम चालू करण्याकरिता विद्यापीठ अनुदान आयोग व प्रस्तुत विद्यापीठाने परवानगी दिली असून सदर अभ्यासक्रम प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी विद्यार्थ्यांना आकारावयाची फी निर्धारित करुन मिळावी. असा विषय दि.१८/०६/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चिती बैठकीत ठेवण्यात आला होता.

सदर विषयावर शुल्क निश्चित समितीने महाविद्यालयाने प्रस्तावित केलेल्या शुल्कात खालील बदल करण्याची शिफारस ठराव क्र. ४ नुसार विद्या परिषदेस केली आहे.

शैक्षणिक शुल्क प्रथम वर्षासाठी ₹१५,०००/- द्वितीय वर्षासाठी ₹१८,०००/- व तृतीय वर्षासाठी ₹१८,०००/- ओळखपत्रासाठी ₹५०/- इन्श्युरन्स फी विद्यापीठाच्या नियमानुसार राहील (सहपत्र ०७ प्रमाणे) तर हेल्थ चेकअप हे शिर्षक वगळण्यात आल्याची शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **B. Voc. Food Processing भाग-१ ते ३ साठी वेतन निश्चिती समितीने शुल्क निश्चिती तक्ता सहपत्र ०७ नुसार केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

**[ ५२ ] भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशलवर्क, सोलापूर हे महाविद्यालय व सदरचा M S W हा कोर्स अनुदानित असल्यामुळे महाविद्यालयाची फी वाढीची विनंती शुल्क निश्चिती समितीने अमान्य करण्याची शिफारस विद्या परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: मा. अध्यक्ष भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशलवर्क, सोलापूर या महाविद्यालयातंर्गत M S W भाग-१ साठी ३० व M S W भाग-२ साठी ३० अशी विद्यार्थी प्रवेशास मान्यता आहे. विद्यापीठाने समाजकार्य M S W साठी निश्चित केलेल्या अभ्यासक्रमामध्ये सेमिनार, वर्कशॉप, सामाजिक शिबिर इ. समावेश केला आहे. परंतू विद्यापीठाने M S W साठी निश्चित केलेल्या फी नुसार सदर कार्यक्रम राबविणे अशक्य आहे. त्यामुळे महाविद्यालयाने निश्चित केलेल्या शुल्कास मंजूरी मिळण्याबाबतची विनंती मा. अध्यक्ष भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशलवर्क यांनी दि.१८/०६/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चिती बैठकीत केली होती.

शुल्क निश्चिती समितीने सदरचा विषय ठराव क्र.३ अन्वये अमान्य करुन तशी शिफारस विद्या परिषदेकडे केली आहे.

सबब, वरीलप्रमाणे अमान्य केल्याची शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशलवर्क, सोलापूर हे महाविद्यालय व सदरचा M.S.W. हा कोर्स अनुदानित असल्यामुळे महाविद्यालयाची फी वाढीची विनंती शुल्क निश्चिती समितीने अमान्य करण्याची शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

**[ ५३ ] विना अनुदानित कोर्सेससाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कास शुल्क निर्धारण समितीची शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: मा. प्राचार्य, डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर यांच्याकडे सन २०१८-१९ साठी महाविद्यालयात विना अनुदानित कोर्सेससाठी संलग्न प्रमाणपत्रे शुल्क आकारण्यात येत आहे. सदर शुल्क संबंधित कोर्सच्या सुरुवातीपासून आस्तित्वात आहेत. तसेच सोबत फी तक्ता जोडण्यात आला आहे. परंतू समाज कल्याण विभागाने सदर शुल्क आपल्या मान्यतेने ऑनलाईन डिस्पले करण्यासंदर्भात कळविले असल्याने त्यास मान्यता मिळावी अशी विनंती केली होती.

याबाबत दि.१८/०६/२०१९ रोजीच्या बैठकीत शुल्क निश्चिती समितीने १) शासनाने निर्धारित केलेल्या शुल्क शिर्षकांप्रमाणे (Heads) विद्यापीठाच्या शुल्क शिर्षकामध्ये (Heads) आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

२) विद्यापीठाने सन २००९-१० या वर्षात निर्धारित केलेल्या विना अनुदानित अभ्यासक्रमाच्या शुल्कास मान्य करुन विद्या परिषदेकडे शिफारस केल्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **विना अनुदानित कोर्सेससाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कास शुल्क निर्धारण समितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

**[ ५४ ] शैक्षणिक शुल्क वर्ष २०१९-२० पासून नवीन अभ्यासक्रम (पाठ्यक्रम), विषय, अतिरिक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्याकरिता विविध संस्थाकडून / महाविद्यालयाकडून प्रथम संलग्निकरणासाठी प्राप्त होणारे प्रस्ताव तसेच संलग्निकरणाचे नुतनिकरण, नैसर्गिक विस्तार, कायम संलग्निकरण व इतर अभ्यासक्रमाकरिता प्रस्ताव सादर करुन घेण्याकरिता आकारावयाचे शुल्क निश्चित संदर्भात शुल्क समितीने शिफारस केल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: दि.१८/१२/२०१८ रोजी तत्कालिन बीसीयुडी (संलग्नता विभाग) विभागाकडून सहपत्रे ०७ ते ११ विहित शुल्क तक्त्याप्रमाणे दि.१८/०६/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत शुल्क निश्चिती समितीकडे विषय ठेवले असता, शुल्क निश्चिती समितीने खालील ठराव पारित केले आहेत.

१) B. R. आणि M. R. विषयांसाठी इंजिनेअरिंग या सदराखाली प्रस्तावित केलेले शुल्क आकारण्यात यावे तसा उल्लेख परिपत्रकात करावा.

२) B. Sc. Food Processing अभ्यासक्रम B. Voc अंतर्गत समावेश करावा.

३) B. Voc अंतर्गत पदविका अभ्यासक्रमासाठी सुचविण्यात आलेले शुल्क मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शुल्क खालीलप्रमाणे आहेत:

B. Voc. Skill Diploma New Affiliation Fee Rs.10,000/- (any subject)
New subject Fee Rs.500/- (per subject)
Natural Extension Fee Rs.1,000/- (up to five subject) & each additional subject Rs.500/-
Additional Division Fee Rs.1,000/- (up to five subject) & each additional subject Rs.500/-
New Course Fee Rs.10,000/- Continuation of Affiliation Fee Rs.300/- (per subject), Permanent Affiliation Fee Rs.10,000/-
Skill Devolvement (Certificate any subject) New Affiliation Fee Rs.5,000/-
New subject Fee Rs.200/-
Natural Extension Fee Rs.500/- & 100/- additional Division Fee Rs.500/- & 100/-, New Course Fee Rs.500/-
Continuation of Affiliation Fee Rs.150/- (per subject)
Permanent Affiliation Fee Rs.5,000/-

सबब, उपरोक्त प्रकारचे शुल्क निश्चित करणेसंदर्भात दि.१८/०६/२०१९ रोजीच्या बैठकीत शुल्क निश्चिती समितीने विद्यापरिषदेकडे शिफारस केल्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा विषय योग्य त्या दुरुस्तीसह पुनश्च: विद्या परिषदेच्या बैठकीत सादर करावा असे ठरले. |

**[ ५५ ] शैक्षणिक वर्ष, २०१९-२० पासून सुरू करण्यात आलेल्या B. Voc. Part- I १. Refrigeration and Air Conditioning, २.Automobile Servicing, ३.Software Development या पाठ्यक्रमाचा आराखडा व अभ्यासक्रम निवड आधारित श्रेयांक प्रणालीनुसार (CBCS) तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमास दि.१३/०९/२०१९ रोजी स्थायी अभ्यासमंडळाने तद्नंतर दि.०७/११/२०१९ रोजी विद्याशाखेने व दि.१४/०९/२०१९ रोजी अधिष्ठाता मंडळाच्या वतीने मा. प्र-कुलगुरू महोदयांनी स्वीकारून विद्या परिषदेकडे शिफारस केल्याची बाबविचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ अनुदान आयोगाने कौशल्याधारित अभ्यासक्रमांना चालना देण्यासाठी B. Voc. अभ्यासक्रमाची एक योजना जाहीर केली होती. त्यानुसार विद्यापीठ सलंग्नित महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता घेतली असून, UGC कडून तयार करण्यात आलेल्या B .Voc. Part- I १. Refrigeration and Air Conditioning, २.Automobile Servicing, ३.Software Development या पाठ्यक्रमाचा आराखडा व अभ्यासक्रमास Mechanical Engineering आणि Computer Science & Engineering या स्थायी अभ्यासमंडळांनी दि.१३/०९/२०१९ रोजी मान्यता देवून विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेकडे शिफारस केली होती. विद्याशाखेची बैठक दि.०७/११/२०१९ रोजी घेण्यात आली असून सदर बैठकिमध्ये B. Voc. Part- I १. Refrigeration and Air Conditioning, २.Automobile Servicing, ३.Software Development या पाठ्यक्रमाचा आराखडा व अभ्यासक्रमास दुरूस्तीसह मान्यता देवून अधिष्ठातामंडळाकडे शिफारस करण्यात आली. दि.१४/११/२०१९ रोजी अधिष्ठाता अधिष्ठाता मंडळाची बैठक नजिकच्या काळात प्रायोजित नसल्याने सदर प्राधिकरणाकडून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३६ (२) (क) आणि कलम ३७ (१) (ख) नुसारमा. प्र-कूलगुरू, यांनी अधिष्ठाता मंडळाच्या वतीने स्वीकारून विद्या परिषदेकडे शिफारस केली आहे.

सबब, B. Voc. Part- I १. Refrigeration and Air Conditioning, २.Automobile Servicing, ३.Software Development पाठ्यक्रमाचा आराखडा व अभ्यासक्रम विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा विषय योग्य त्या दुरुस्तीसह पुनश्च: विद्या परिषदेच्या बैठकीत सादर करावा असे ठरले.** |

[ ५६ ] **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये विद्यापीठ परिसरातील कला व ललितकला संकुलांतर्गत सरु असलेल्या M. A. (Music) Instrumental Music Tabla / Pakhavaj Semester- I & II आणि M. A. (Music) Vocal / Instrumental Semester- I & II तसेच M.A. Dramastics Semester- I & II या पाठ्यक्रमास मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या कला व ललित कला संकुलांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून M. A. (Music) Instrumental Music Tabla / Pakhavaj Semester- I & II आणि M. A. (Music) Vocal / Instrumental Semester- I & II तसेच M. A. Dramatics Semester- I & II हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले असून, सदर अभ्यासक्रमांचा निवड आधारित श्रेयांक प्रणालीनुसार (CBCS) Sem. I & II पाठ्यक्रम संबंधित उपसमित्यांकडून तयार करुन घेण्यात येऊन त्यास दि.२३/०९/२०१९ रोजीच्या बैठकीत Music अस्थायी अभ्यासमंडळाने सदर पाठ्यक्रम स्वीकारुन विद्याशाखेकडे शिफारस केली आहे.

नजिकच्या कालावधीत विद्याशाखेची बैठक प्रायोजित नसल्याने उपरोक्त सर्व पाठ्यक्रमास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३४ (४) (क) आणि ३५ (छ) नुसार विद्याशाखेच्यावतीने स्वीकारुन मा. प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांनी अधिष्ठाता मंडळाकडे शिफारस केली आहे.

तद्नंतर अधिष्ठाता मंडळाची बैठक प्रायोजित नसल्याने मा. प्र-कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३६ (२) (क) आणि कलम ३७ (१) नुसार अधिष्ठाता मंडळाच्यावतीने स्वीकारुन विद्या परिषदेकडे शिफारस केली आहे.

परंतु, सदर पाठ्यक्रम संकुलातील विद्यार्थीहित लक्षात घेता तसेच नजिकच्या काळात विद्या परिषदेची बैठक प्रायोजित नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये विद्या परिषदेच्यावतीने मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**[ ५७ ] महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये विद्यापीठ परिसरातील भाषा व वाङमय संकुलांतर्गत सरु असलेल्या M. A. - I I Sem III & IV संस्कृत व M. A. - I Sem I & II पाकृत आणि पाली या पाठ्यक्रमास मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या भाषा व वाङमय संकुलांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून एम. ए. संस्कृत हा अभ्यासक्रम सुरु करुन सदर अभ्यासक्रमाचा Sem - III & IV पाठ्यक्रम तर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नव्याने सुरु करण्यात आलेल्या M. A. - I पाकृत आणि पाली अभ्यासक्रमाचे M. A. - I Sem. I & II पाठ्यक्रम उपसमितीने तयार केला सदर पाठ्यक्रम दि.१९/०९/२०१९ रोजीच्या अस्थायी अभ्यासमंडळाच्या बैठकीत स्वीकारुन विद्याशाखेकडे शिफारस करण्यात आली.

नजिकच्या कालावधीत विद्याशाखेची बैठक प्रायोजित नसल्याने उपरोक्त सर्व पाठ्यक्रमास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३४ (४) (क) आणि ३५ (छ) नुसार विद्याशाखेच्यावतीने स्वीकारुन मा. प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांनी अधिष्ठाता मंडळाकडे शिफारस केली आहे.

तद्नंतर अधिष्ठाता मंडळाची बैठक प्रायोजित नसल्याने मा. प्र-कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३६ (२) (क) आणि कलम ३७ (१) नुसार अधिष्ठाता मंडळाच्यावतीने स्वीकारुन विद्या परिषदेकडे शिफारस केली आहे.

परंतु, सदर पाठ्यक्रम संकुलातील विद्यार्थीहित लक्षात घेता तसेच नजिकच्या काळात विद्या परिषदेची बैठक प्रायोजित नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**[ ५८ ] M. Sc. Physics (Solid State), M. Sc. Physics (Nanophysics), M. Sc. Condensed Matter Physics; ५ Year Integrated M. Tech. Course in Cosmetic Technology & B. Voc. Journalism & Mass Communication या विना अनुदानित Course चे शुल्क अधिष्ठाता मंडळाने व शुल्क निश्चिती समितीने शिफारस केल्यानुसार विद्यापरिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: मा. प्राचार्य, डी. बी. एफ. दयानंद कॉलेज आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर यांनी दि.०४/१०/२०१९ रोजीच्या पत्रानुसार M. Sc. (Solid State) भाग १ व २ शुल्क निश्चिती करुन मिळणे संदर्भात प्रस्ताव सादर केला आहे.

मा. प्राचार्य, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी यांनीही दि. ११/१०/२०१९ रोजीच्या पत्रानुसार M. Sc. Physics (Nanophysics) भाग १ व २ ची शुल्क निश्चिती करुन मिळणेबाबत विनंती केली आहे.

मा. डॉ. आर. बी. चिंचोलकर, विभाग प्रमुख जर्नालिझम ॲन्ड मास कम्युनिकेशन विभाग सामाजिकशास्त्रे संकुल यांनी दि.१७/१०/२०१९ रोजीच्या पत्रान्वये B. Voc. Journalism & Mass Communication भाग १ ते ३ ची शुल्क निश्चिती करणेबाबत विनंती केली आहे.

उक्त प्रस्ताव दि. १९/१०/२०१९ रोजीच्या अधिष्ठाता मंडळात सादर केले असता अधिष्ठाता मंडळाने खालील ठराव पारित केले आहेत.

“जे शुल्क विद्यापीठाकडून निश्चित केले जातात अशा शुल्कासमोर शुल्क न लिहिता Common fees as per other courses असे नमूद करण्याचे ठरले. तसेच शासन ज्या प्रमाणे शुल्काची प्रतिपूर्ती करते त्याप्रमाणे काही शुल्कांचा तपशील बदलण्यात आला. त्यानुसार एम. एस्सी पदार्थविज्ञान Physics- Solid State, Nanophysics (विना अनुदानित) भाग १ व २ या अभ्यासक्रमासाठी सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे शुल्क निर्धारण करुन, शुल्क निर्धारण समितीकडे शिफारस करण्यात आली.

तर B. Voc. Journalism & Mass Communication भाग १ ते ३ या अभ्यासक्रमासाठी सविस्तर चर्चा होऊन जे शुल्क विद्यापीठाकडून निश्चित केले जाते अशा शुल्कासमोर शुल्क न लिहिता As per University rules असे नमूद करण्याचे ठरले तसेच शासन ज्याप्रमाणे शुल्काची प्रतिपूर्ती करते त्याप्रमाणे काही शुल्कांचा तपशील बदलण्यात आला. त्यानुसार B. Voc Journalism & Mass Communication अभ्यासक्रमासाठी सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे शुल्क निर्धारण समितीकडे शिफारस करण्यात आली.

उपरोक्त विषय आणि दि.२०/१०/२०१९ रोजीच्या शुल्क निश्चिती समितीच्या बैठकीत विद्यापीठ परिसरातील विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यात आलेल्या M. Sc. Condensed Matter Physics तसेच ५ Year Integrated M.Tech Course in Cosmetic Technology या कोर्सच्या शुल्का संदर्भात मा. अध्यक्षांच्या सूचनेनुसार आयत्या वेळेचा विषय व ठराव म्हणून समावेश करण्यात येऊन त्यावर सर्वंकष चर्चा करुन विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर केले आहे.

परंतु नजिकच्या काळात विद्यापरिषदेची बैठक प्रायोजित नसल्याने तसेच शासनाच्या पोर्टलवर दि.३०/१०/२०१९ पूर्वी शिक्षण शुल्क व इतर शुल्क Update करण्याचे असल्याने तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये विद्यापरिषदेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**[ ५९ ] प्रस्तुत विद्यापीठ परिसरात वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामार्फत सुरु करण्यात आलेल्या M. B. A. या पाठ्यक्रमाच्या प्रथम वर्षाचा आराखडा व अभ्यासक्रम निवड आधारित श्रेयांक प्रणालीनुसार (CBCS) तयारकरण्यात आलेल्या अभ्यासक्रमास शै. वर्ष २०१९-२० पासून मान्यता देण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरू महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील M. B. A. या पाठ्यक्रमाचा निवड आधारित श्रेयांक प्रणालीनुसार (CBCS) True Spirit या निकषानुसार उपसमितीने तयार केलेला अभ्यासक्रम विद्यापीठास सादर केला आहे.

सदरचा अभ्यासक्रम अभ्यासमंडळाने दि.७/०९/२०१९ रोजीच्या बैठकीत मान्य करून विद्याशाखेस शिफारसकेली.

सदर अभ्यासक्रम वाणिज्य विद्याशाखेच्या दि.२४/०९/२०१९ रोजीच्या बैठकीत सादर केला असता संकुल व महाविद्यालयासाठी वेगवेगळा अभ्यासक्रम तयार करता येणार नाही, असा ठराव करून संकुल व महाविद्यालयासाठी एकच अभ्यासक्रम तयार करणेसाठी समिती गठीत केली. सदरच्या समितीच्या दि.२६/०९/२०१९ रोजी, दि.४/१०/२०१९ रोजी आणि दि.९/१०/२०१९ रोजी बैठका संपन्न झाल्या, परंतु दोन्ही अभ्यासक्रम एक करण्यासाठी कार्यवाही पूर्ण न झाल्याने व संकुलामध्ये प्रस्तावित अभ्यासक्रमानुसार अध्यापन सुरू असल्याने विद्यार्थी हित लक्षात घेता मा. कुलगुरूमहोदयांनी तातडीची बाब म्हणून सर्व प्राधिकरणाच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) नुसार संकुलासाठी अभ्यासमंडळाने दि.७/०९/२०१९ रोजी शिफारस केलेल्या अभ्यासक्रमास दि.२२/१०/२०१९ रोजीच्या टिपणी अन्वये मान्यता दिलेली आहे.

सबब, उपरोक्तप्रमाणे विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामार्फत प्रस्तावित M. B. A. अभ्यासक्रमास शै. वर्ष २०१९-२० पासून मान्यता देण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**[ ६०(१) ] कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या महाविद्यालयाच्या शै. वर्ष २०१९-२० पासून बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणाची बाब विचारार्थ.**

(टिपणी: कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाच्या प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करणेकामी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१) प्राचार्य डॉ. के. जे. करांडे (अध्यक्ष)

२) श्री. एम. एस. पवार (सदस्य)

३) मा. शिक्षण संचालक, (उ.शि.), पुणे (सदस्य)

४) श्री. एम. एम. पवार (सदस्य)

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून समितीने बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या तीन वर्षांकरिता शिफारस केलेली आहे.

स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटीपूर्तता करणेबाबत महाविद्यालयास पत्रान्वये कळविले होते, त्यानुषंगाने महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला अटीपूर्तता अहवाल सोबत जोडला आहे.

सबब, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या महाविद्यालयाच्या बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या तीन वर्षांकरिता मान्यता देण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या महाविद्यालयाच्या बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या तीन वर्षांकरिता मान्यता देण्यात आली.** |

[ ६०(२) ] **विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अंतर्गत शैक्षणिक वर्ष, २०१९-२० पासून सुरू असलेल्या Computer Science & Engineering and Information Technology या अभ्यासमंडळांनी Second Year B. Tech, Third Year & Final Year B. E. सुधारित केलेला पाठयक्रम विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा बैठकितील ठराव क्र.३ व ४ नुसार शिफारस केल्याप्रमाणे अधिष्ठाता मंडळाच्या वतीने मा.प्र-कुलगुरू यांनी स्विकारला असून, सदरच्या सुधारित पाठ्यक्रमाची केलेली शिफारस विद्या परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या दि.०७/११/२०१९ रोजीच्या बैठकीतील आयत्या वेळीच्या विषयावरील ठराव क्र. ३ व ४ खालील प्रमाणे:

"Incorporating Course Outcomes and Course Objectives in the Syllabus of Computer Science & Engineering and Information Technology in the following.

1) S. Y. B. Tech. (CBCS) Implemented w. e. f. 2019-20
2) T. E. (CBCS) Implemented w. e. f. 2019-20
3) B. E. (CBCS) Implemented w. e. f. 2019-20"

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेने सदरचा सुधारीत अभ्यासक्रमाची शिफारस केल्याप्रमाणे मा.प्र-कुलगुरू महोदयांनी अधिष्ठाता मंडळाच्या वतीने दि.२२/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये स्विकारून विद्यापरीषदेकडे शिफारस केली आहे.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने,शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सुरु असलेल्याविज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अंतर्गत Computer Science & Engineering and Information Technologyया अभ्यासमंडळांच्या अध्यक्षांनी व सदस्यांनी सुधारीत केलेला Second Year B. Tech, Third Year & Final Year B. E. चा सुधारित पाठ्यक्रम विद्या परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अंतर्गत शैक्षणिक वर्ष, २०१९-२० पासून सुरू असलेल्या Computer Science & Engineering and Information Technology या अभ्यासमंडळांनी Second Year B. Tech, Third Year & Final Year B. E. सुधारित केलेला पाठयक्रम विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा बैठकितील ठराव क्र.३ व ४ नुसार शिफारस केल्याप्रमाणे अधिष्ठाता मंडळाच्या वतीने मा.प्र-कुलगुरू यांनी स्विकारला असून, सदरच्या सुधारित पाठ्यक्रमाची केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.** |

[ ६०(३) ] **प्रस्तूत विद्यापीठाच्या १५ व्या दीक्षांत समारंभापासून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पदवी, पदवीका प्रमाणपत्रावर Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University असे नाव, छपाई करतेवेळी सद्यस्थितीत असलेल्या मागील वर्षाच्या पदवी प्रमाणपत्रातील कलर, डिझायन, Font व Security features मध्ये बदल करुन सोबत जोडलेल्या नमून्याप्रमाणे नव्याने पदवी प्रमाणपत्र छपाई करुन घेण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र शासनाच्या दि.०५/०३/२०१९ रोजीच्या राजपत्रानुसार सोलापूर विद्यापीठाचा "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर" असा नामविस्तार प्रचलित करण्यात आला असल्याने प्रस्तूत विद्यापीठाच्या आगामी संपन्न होणाऱ्या १५ व्या दीक्षांत समारंभापासून देण्यात येणाऱ्या पदवी, पदवीका प्रमाणपत्रावर Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University (Formerly Solapur University) अस नाव छपाई करुन घ्यावे लागणार आहे. सदरील छपाई करतेवेळी सद्यस्थितीत असलेल्या मागील वर्षाच्या पदवी प्रमाणपत्रामधील कलर, डिझायीन, Font व Security features मध्ये बदल करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तूत विद्यापीठाच्या १५ व्या दीक्षांत समारंभापासून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पदवी, पदवीका प्रमाणपत्रावर Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University असे नाव, छपाई करतेवेळी सद्यस्थितीत असलेल्या मागील वर्षाच्या पदवी प्रमाणपत्रातील कलर, डिझायन, Font व Security features मध्ये बदल करुन सोबत जोडलेल्या नमून्याप्रमाणे नव्याने पदवी प्रमाणपत्र छपाई करुन घेण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **प्रस्तूत विद्यापीठाच्या १५ व्या दीक्षांत समारंभापासून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पदवी, पदवीका प्रमाणपत्रावर Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University असे नाव, छपाई करतेवेळी सद्यस्थितीत असलेल्या मागील वर्षाच्या पदवी प्रमाणपत्रातील कलर, डिझायन, Font व Security features मध्ये बदल करुन सोबत जोडलेल्या नमून्याप्रमाणे नव्याने पदवी प्रमाणपत्र छपाई करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.** |

[ ६०(४) ] **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे सातव्या वेतन आयोगानुसार सहाय्यक प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक ते प्राध्यापक पदाकरिता नवीन गुणांकन नियमावली विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे सातव्या वेतन आयोगानुसार सहाय्यक प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक ते प्राध्यापक पदाकरिता दि.०८ मार्च, २०१९ रोजीच्या सातव्या वेतन आयोगाच्या शासन निर्णयास अनुसरुन CAS प्रक्रिया सुलभ रित्या पार पाडण्याकरिता नवीन गुणांकन नियमावली तयार करण्यासाठी दि.२०/११/२०१९ रोजीच्या प्रशासकीय मान्य टिपणीन्वये मा. प्र-कुलगुरुमहोदयांनी समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने दि.२५/११/२०१९ रोजी बैठक घेऊन नियमावली तयार करुन सादर केली असून सदरची नियमावली सोबत अवलोकनार्थ सादर.

सबब, सहाय्यक प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकते प्राध्यापक पदासाठी CAS प्रक्रिया सुलभरित्या पार पाडण्याकरिता समितीने तयार केलेली नवीन गुणांकन नियमावली विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे सातव्या वेतन आयोगानुसार सहाय्यक प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक ते प्राध्यापक पदाकरिता नवीन गुणांकन नियमावलीस मान्यता देण्यात आली.** |

**[ ६०(५) ] पीएच. डी. विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते मौखिक परीक्षापर्यंतची सर्व कार्यवाही संशोधन विभागाकडून केली जात असल्याने पीएच. डी. विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षेनंतरचे Declaraton of Result हे परीक्षा व मूल्यमापन मंडळ या विभागाकडून देण्याऐवजी संशोधन विभागाकडून देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सद्यस्थितीत पीएच. डी. प्रवेशापासून ते मौखिक परीक्षा (Viva-voce) घेणेपर्यंतची सर्व कार्यवाही संशोधन विभागाकडून करण्यात येते व मौखिक परीक्षा झाल्यानंतर मा. कुलगुरुमहोदयांची मान्यता घेवून मूळ प्रकरण परीक्षा विभागाकडे पाठविणत येते. परीक्षा विभागाकडून परत एकदा रितसर मान्यता घेवून मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या स्वाक्षरीने Declaration of Result दिले जाते. ही प्रक्रिया करताना विनाकारण बराच कालावधी जातो व विद्यार्थ्याला सदरील पत्र मिळण्यास विलंब होतो.

पीएच. डी. विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते मौखिक परीक्षापर्यंतची सर्व कार्यवाही संशोधन विभागाकडून केली जाते. विद्यार्थ्याचे सर्व संबंधित कागदपत्रे संशोधन विभागातच उपलब्ध असतात. त्यामूळे विद्यार्थ्यांचे Ph. D. Declaration of Result हे संशोधन विभाकडूनच काढले तर सोईस्कर होईल. जेणेकरुन विद्यार्थ्यास मौखिक परीक्षा झालेल्या दिवशीच Declaration of Result देता येईल व वेळेचा विलंब टाळता येईल.

प्रस्तूत विद्यापीठात पीएच. डी. प्रवेशाबाबत नियम करण्यात आलेले असून विद्या परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ६८ दि.१६/०८/२०१४ अन्वये मंजूर करण्यात आलेले आहेत. सदर नियमावलीतील R. Ph. D. २४ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

(i) On the acceptance of the recommendation of the Open Defence, by the Hon'ble Vice-Chancellor, the Controller of Examinations shall declare the result. The date of acceptance of the report of Open Defence by the Hon'ble Vice-Chancellor shall be treated as the date of the declaration of the result.

तसेच दि.२१/०६/२०१८ रोजी झालेल्या विद्या परिषद बैठकीत विषय क्र.६६ अन्वये पीएच. डी. अभ्यासक्रमाची नियमावली दुरुस्त करण्यास मान्यता देण्यात आली असून सुधारित नियमावलीतील नियम क्र.R. Ph. D. १६ Declaration of Result खालीलप्रमाणे आहे.

(16.1) The Viva-Voce / Open Defence will be held only after fulfillment of the all essential requirements.

(16.2) The date of Viva-Voce / Open Defence would be considered to be the date of declaration of result. The provisional declaration certificate should be given to the student on same day after Viva-Voce / Open Defence.

(16.3) On the final approval of the Hon'ble Vice-Chancellor, the Director Board of Examinations and Evaluation shall declare the result after the fulfillment of all conditions.

(16.4) Along-with the degree, the concerned section shall certify to the effect that the degree has been awarded in accordance with the provisions of UGC rules and regulations as published in the Gazette of India dated 05th May, 2016.

सदर तरतूदीनुसार Ph. D. Declaration of Result हे परीक्षा विभागाकडून देण्याबाबत तरतूद आहे. तथापि, वर दर्शविल्याप्रमाणे पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा झाल्यानंतर देण्यात येणारे Declaratio of Result संशोधन विभागाकडून देण्यास तसेच Declaration of Result चे पत्र संशोधन विभागात कार्यरत असलेल्या उपकुलसचिव / सहायक कुलसचिव यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले तर विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सोयीस्कर राहील. त्यास्तव, सदरील नियम बदलण्यासाठी उपरोक्त विषय विद्या परिषदेच्या बैठकीसमोर ठेवावा लागेल.

सबब, पीएच. डी. विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते मौखिक परीक्षापर्यंतची सर्व कार्यवाही संशोधन विभागाकडून केली जात असल्याने पीएच. डी. विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षेनंतरचे Declaration of Result हे परीक्षा व मूल्यमापन मंडळ या विभागाकडून देण्याऐवजी संशोधन विभागाकडून देण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **पीएच. डी. विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते मौखिक परीक्षापर्यंतची सर्व कार्यवाही संशोधन विभागाकडून केली जात असल्याने पीएच. डी. विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षेनंतरचे Declaraton of Result हे परीक्षा व मूल्यमापन मंडळ या विभागाकडून देण्याऐवजी संशोधन विभागाकडून देण्याबाबत मान्यता देण्यात आली.** |

मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे कुलसचिवांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **कुलसचिव** | **मा. कुलगुरु** |
| **(सदस्य सचिव, विद्या परिषद)** | **(अध्यक्ष, विद्या परिषद)** |